किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● विवेकदीप
५● पत्रकारितेचा ‘नोबेल’ सन्मान
११● ...याला ‘माणूस’ ऐसे नाव !
१७● आता पर्व (उप)नगरीय वाढीचे...
२१● जिकडेतिकडे
२५● स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...



खंड १४ : अंक ८ नोव्हेंबर २०१५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी



वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **‘अर्थबोधपत्रिका’** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १४ (अंक ८) नोव्हेंबर २०१५**
**संपादक - अभय टिळक**
**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**


*‘अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?’*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **‘अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# विवेकदीप

'अर्थबोधपत्रिके'च्या कुटुंबातील सगळ्यांच लहानथोरांना येणारे नूतन संवत्सर आनंदाचे, सुखसमाधानाचे, भरभराटीचे व उत्तम आरोग्याचे ठरो, हीच शुभकामना.

दसरा आणि दीपावली हे प्रकाशाची उधळण करणारे सण. भवतालातील घनतिमिर विरघळवून टाकत दीप्तीची राणीव निर्माण करणा-या या सणांची म्हणूनच सगळ्यांना असोशी असते. यंदा मात्र या सणांवर छाया होती ती आनंद व उत्साहापेक्षाही अस्वस्थतेची आणि औदासिन्याची. सध्याची अस्मानी आणि सुलतानी अशी उभय परिस्थितीच हुरूप वाढविणारी नाही. महाराष्ट्राच्या काही भागांत तर यंदा भीषण पाणीटंचाई पुढ्यात मांडून ठेवलेली आहे. दिवाळीनंतर घरी येणा-या धान्य आणि धनराशीपायी भरून पावणारा बळीराजा यंदा विलक्षण चिंताक्रांत आहे. आश्वस्त वाटावे असे कोठेच फारसे काही घडताना दिसत नाही. देशातील जवळपास सर्वच प्रांतांत कोणत्या ना कोणत्या कारणाने अशांतता आणि असमाधान दाटलेले आहे. आरक्षणाच्या मुद्यावरून गुजरात खदखदतो आहे. धार्मिक आणि/अथवा जातीय उन्मादापायी उत्तर प्रदेश आणि हरियाना जखमी आहेत. कलबुर्गींच्या हत्येपायी केवळ कर्नाटकच नव्हे तर एकंदरच सुजाण विश्व आतून ढवळून निघालेले जाणवते. वैचारिक सहिष्णुतेचा श्वास कोंडला जात असल्याच्या भावनेने भारलेले साहित्यिक शासनसंस्थेकडून पूर्वी मिळालेले पुरस्कार परत करत आपापल्या मनीमानसीचे क्लेश व्यक्त करत आहेत. 'गुरू ग्रंथसाहिबा'च्या अवहेलनेपायी दुखावले गेलेले शीख बांधव त्यांच्या हृदयातील आक्रोश आक्रमकपणे व्यक्त करत असल्याने पंजाब पुन्हा एकवार अस्वस्थ बनू पाहतो आहे. सीरियासह मध्य आशियातील देशोदेशींचे पीडित युरोपकडे त्यांची पावले वळवत असल्याने स्थानिक 'भूमिपुत्र विरुद्ध उपरे' या द्वैतातून निर्माण होणा-या अशांततेबरोबरच या स्थलांतरितांना सामावून घ्यायचे तरी कसे, या चिंतेने व्यापलेले युरोपातील देशोदेशीचे नेतृत्त्व हवालदील झालेले दिसते.



एकंदरीनेच, सुबुद्ध नागरिकांच्या प्रगल्भ मानसिक स्थैर्याची कसोटी बघितली जावी असेच घरीदारी वातावरण आहे. उन्मादी आक्रमकतेच्या, संकुचित भावभावनांच्या, विखारी प्रेरणा-जाणिवांच्या या वावटळीमध्ये आपल्या अंतःकरणातील विवेकदीप तेवत ठेवणे हेच आपल्या सगळ्यांच्या पुढ्यातील एक अत्यंत बिकट आव्हान ठरणार आहे. कितीही जोराचे वादळ आले तरी आपल्या विवेकदीपाची वात विझू द्यायची नाही आणि त्याच वेळी समाजमनाच्या गाभा-यात तेवणा-या विवेकदीपावर अविवेकाची काजळी जमू लागली तर ती फेडण्यासाठी कार्यतत्पर बनायचे, असे दुहेरी उत्तरदायित्व आपल्या सगळ्यांनाच या पुढे डोळ्यांत तेल घालून निभवावे लागणार आहे. त्यासाठी गरज असते ती उदंड अशा आंतरिक सामर्थ्याची. व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनातील किमान नीतीमत्तेच्या जोपासनेतूनच ते सामर्थ्य निपजत असते... आणि अशा नीतीमत्तेच्या पालनासाठीही पुन्हा ज्योत उजळावी लागणार आहे ती विवेकदीपाचीच ! ■■

### वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

### निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

साहित्य

# पत्रकारितेचा 'नोबेल' सन्मान

नित्यनेमाप्रमाणे या वर्षी ऑक्टोबर महिन्यात स्विडिश अकादमीचे नोबेल पुरस्कार जाहीर झाले आणि दरवर्षीप्रमाणेच यंदाही प्रसिद्धीच्या वलयापासून दूर राहून आपल्या क्षेत्रात नवनवीन क्षितिजे धुंडाळणा-या प्रतिभावंतांची ओळख जगाला झाली. पुरस्कार मिळाल्याने संबंधित व्यक्तीच्या कार्याचा गौरव तर होतोच पण तो पुरस्कार त्या व्यक्तीचे कार्यही लोकांपर्यंत पोहोचवतो. सर्वाधिक प्रतिष्ठेचा मानला जात असल्याने नोबेल पुरस्काराच्या बाबतीत, तो ज्यांना मिळालेला असतो त्यांच्या कार्यकर्तृत्वाबाबत नेहमीच उत्सुकता असते. हेच या पुरस्कारांचे वेगळेपण आहे. या पुरस्कारांच्या वेगळेपणात भर घालणारी आणखी एक घटना या वर्षी घडली.

या वर्षीचा साहित्याचा नोबेल पुरस्कार बेलारूसच्या Svetlana Alexievich यांना देण्यात आला. आजवर वाङ्मयीन लेखनासाठी देण्यात येणारा हा पुरस्कार या वर्षी एका पत्रकार महिलेला तिच्या वास्तवाधारित लिखाणाला दिला गेला. एखाद्या स्त्रीला मानाचा पुरस्कार मिळणे यात आता फारसे अप्रुप राहिलेले नाही. परंतु, Svetlana यांच्या बाबतीत मात्र त्यांची स्त्री म्हणून असलेली ओळख अधिक महत्त्वाची आहे. याचे कारण त्यांचा सविस्तर परिचयच आपल्याला जास्त चांगल्या प्रकारे सांगू शकेल.

Svetlana यांचा जन्म ३१ मे १९४८ रोजीचा. त्यांचे वडील जन्माने बेलारूसी होते तर आई होती युक्रेनी. वडिलांनी काही काळ लष्करात नोकरी करून राजीनामा दिल्यानंतर त्यांचे कुटुंब बेलारूसमधील एका गावात स्थायिक झाले. Svetlana यांच्या पालकांनी शिक्षकी पेशा पत्करला. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर Svetlana यांनी एका स्थानिक वृत्तपत्रात वार्ताहर म्हणून काम सुरू केले. अर्थात, नोकरी करत असतानाच एका बाजूला त्यांनी आपले विद्यापीठीय शिक्षणही चालू ठेवले. काही वर्षांतच त्या Minsk येथील 'Neman' या वाङ्मयीन मासिकाच्या विशेष प्रतिनिधी म्हणून काम करू लागल्या. पत्रकार म्हणून त्यांची कारकीर्द खूपच लहान



वयात सुरू झाल्याने या क्षेत्रातील अनुभवांकडे बघण्याची त्यांची दृष्टी निःष्पक्ष आणि मन संवेदनशील होते. त्यामुळेच, जेव्हा देशात घडलेल्या ऐतिहासिक घटनांच्या साक्षीदारांचे अनुभव त्यांना नोंदवायला सांगितले गेले त्या वेळी त्या अनुभवांनी Svetlana यांना अंतर्बाह्य बदलून टाकले.

जगाच्या इतिहासात तसेच भूगोलात गेल्या शतकभराच्या काळात अनेक उलथापालथी झाल्या. पण तुलनाच करायची झाली तर, सोव्हिएत रशियाच्या इतिहासात जितक्या नाट्यपूर्ण घटना घडल्या तितक्या त्या अन्य देशांच्या बाबतीत क्वचितच घडल्या असतील. झारची जुलूमी राजवट उलथून आलेली लेनिन यांची आणि त्या नंतर स्टॅलिन यांची राजवट, 'क्रांतीचे अपत्य म्हणजे दुसरी क्रांतीच असते', या न्यायाने स्टॅलिन यांची हुकूमशाही उलथून सोव्हिएत संघराज्याने स्वीकारलेला साम्यवाद, त्या नंतर संघराज्याचे झालेले विघटन आणि आजची स्वतंत्र पण अंतर्गत वादांनी खदखदणारी संघराज्ये... अशी ही एक लांबलचक मालिकाच जणू. यात भर म्हणून की काय, रशियाने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढलेले दुसरे महायुद्ध, अफगाणिस्तानमधील घुसखोरी आणि चेर्नोबिल येथील अणुऊर्जा केंद्रातील स्फोट... या सगळ्या घटनांनी त्या देशाचे राजकीय जीवन तर ढवळून काढलेच पण त्याहीपेक्षा सामाजिक जीवन अधिक ढवळून काढले. या सा-या घटनांत सर्वाधिक होरपळला तो सामान्य माणूस. कित्येक लोक मृत्युमुखी पडले, अनेकांनी आपले जिवलग गमावले. ज्यांना मरण आले ते सुटले, अशी अवस्था मागे राहिलेल्यांची झाली.

कुणाच्या तरी राजकारणाला बळी पडलेल्या या सामान्य लोकांच्या विरहव्यथा Svetlana जवळून पाहात होत्या. त्यांचे अनुभव जाणून घेताना Svetlana यांना आपल्या आयुष्याचे ध्येय सापडले. देशाच्या राजकारणाच्या पटलावर हा शह-काटशहाचा खेळ चालू असताना सामान्य माणसाचे जीवन किती विदारक बनू शकते, हे सगळ्या जगाला दाखवायचे त्यांनी ठरवले. तेच त्यांचे जीवितकार्य झाले. त्या पुढचे त्यांचे प्रत्येक लिखाण, प्रत्येक पुस्तक त्या सामान्य लोकांच्या अनुभवांचे वेगवेगळे रूप घेऊन साकारले. वार्तांकन आणि मौखिक इतिहास यांचा मिलाफ असलेली त्यांची पुस्तके म्हणजे सामान्य माणसाचे आजवर दबलेले आवाज आहेत.

आपल्या पुस्तकांमधून Svetlana यांनी सोव्हिएत रशियाच्या इतिहासाचा सखोल आणि भावनिक मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. 'War's Uncommonly Face' या पुस्तकात त्यांनी दुस-या महायुध्दात नाझी सैन्याशी दोन हात केलेल्या बेलारूसी, युक्रेनी आणि रशियन स्त्रियांच्या भावनांना मोकळी वाट करून दिली. Svetlana जेव्हा त्यांना पहिल्यांदा भेटल्या तेव्हा त्यापैकी ब-याच जणींची आयुष्ये व्यवस्थित मार्गी लागलेली होती. त्यामुळे सुरुवातीला त्या एक 'स्त्री' म्हणून आलेल्या आपल्या ख-या अनुभवांविषयी बोलण्यास तयार नसत. Svetlana यांनी त्यांची मर्जी संपादन करण्यात बरेच दिवस खर्ची घातले. हळूहळू त्या मोकळ्या होऊ लागल्या. जणू काही बरेच दिवस या क्षणाची प्रतिक्षाच त्या करत होत्या.

सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानवर केलेले आक्रमण ही तेथील सामान्य लोकांच्या आयुष्यातील भळभळती जखम आहे. या लढाईत हजारो कोवळी तरूण मुले मारली गेली. जबरदस्तीने सैन्यात भरती केलेल्या या तरूणांचे मृतदेह जस्ताच्या शवपेट्यांतून मायदेशी पाठवले जात. या तरूणांच्या नातेवाईकांचा, त्यांतही त्यांच्या मातांचा आक्रोश Svetlana यांच्या 'Zinky Boys' या पुस्तकातून वाचकांच्या काळजाला हात घालतो.

२६ एप्रिल १९८६ रोजी अशीच एक मोठी आपत्ती सोव्हिएत रशियावर कोसळली. चेर्नोबिल येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या चौथ्या क्रमांकाच्या अणुभट्टीमध्ये स्फोट होऊन मोठी आग लागली. ही आग आटोक्यात आणण्यासाठी सोव्हिएत सरकारने हजारो कर्मचा-यांना अतिशय अपु-या साधनसामग्रीनिशी पाठवले. या दुर्घटनेत प्रत्यक्षात एकच जण मृत्युमुखी पडला असला तरी हजारो लोकांना किरणोत्सर्गाची बाधा झाली आणि त्यांचे आयुष्य तीळ-तीळ करून संपुष्टात आले. ही दुर्घटना प्रत्यक्ष पाहणा-या ५०० लोकांच्या मुलाखती Svetlana यांनी घेतल्या. त्या दुर्घटनेनंतर दहा वर्षांच्या काळात त्या आपत्तीत बळी पडलेल्या लोकांची आयुष्ये कशी बदलत गेली याचा विस्तृत पट Svetlana यांनी 'Voices From Chernobyl' या पुस्तकात मांडला आहे. या दुर्घटनेचे अंगावर काटा आणणारे अनुभव त्यांनी यात शब्दबध्द केले आहेत. ' Second Hand Time 'हे त्यांचे अगदी अलीकडे प्रसिध्द झालेले पुस्तक म्हणजे एका भव्य पण मरणप्राय



संस्कृतीसाठी गायलेले शोकगीत आहे. एखाद्या देशाची मूळ संस्कृती लयाला जाऊन नव्या विश्वात जन्माला येणारा मानव कसा असेल, यावर चिंतन करणारे हे पुस्तक आहे.

आपले अनुभव शब्दबध्द करण्यासाठी Svetlana यांनी 'Polyphonic' या प्रकारची लेखनशैली वापरली. Ale Adimovich या बेलारूसी लेखकाचा आपल्यावर मोठा प्रभाव आहे, असे त्या स्वतः म्हणतात. Adimovich यांनी 'Collective Novel' किंवा 'Novel Evidence' या नावाचा नवीन लेखनप्रकार साहित्यात आणला. 'लोकांनी स्वतःविषयी केलेले चिंतन' असा त्याचा थोडक्यात अर्थ आहे. Adimovich यांच्या लेखनातून Svetlana यांना त्यांची शैली गवसली. लिखाणात उतरणारा अनुभव आपली शैली आणि आकार आपसूक घेऊन येतो, या धारणेपोटीच त्या म्हणतात की, ''मला वास्तव अनुभवांना चांगल्या प्रकारे खुलवू शकेल अशी शैली हवी होती. वास्तव मला कायम चुंबकाप्रमाणे आकर्षित करते. माझ्या मनाचा ताबा घेते, मला घायाळ करते. माझ्या मनाची ही तगमग मला जशीच्या तशी कागदावर उतरवायची होती. त्यामुळे मला या लेखनप्रकाराने भुरळ घातली. माझ्या लेखनात उमटलेले सामान्य लोकांचे हुंकार म्हणजे एक समूहगान आहे. त्याचबरोबर तो या लोकांच्या अनुभवांचा 'कोलाज'ही आहे. अशा प्रकारच्या लेखनातून माझ्या भावनिक आणि मानसिक क्षमता सर्वार्थाने व्यक्त होतात. मी एकाच वेळी लेखक, वार्ताहर, सामाजिक कार्यकर्ती, मानसोपचारतज्ज्ञ आणि प्रवचनकार अशा विविधांगी भूमिका वठवू शकते''. सामान्य लोक आणि त्यांचे अनुभव यांच्या विषयीची Svetlana यांची सहवेदना आणि ते जाणून घेण्याचे त्यांचे कसब यांनी त्यांच्या लिखाणाला कलात्मकतेचे मूल्य दिले आहे. त्यांचे लिखाण हे केवळ मौखिक इतिहास न राहता, सामान्य लोकांच्या मनोव्यथांना एकत्र आणणारे साहित्य म्हणून नावारूपाला आले.

दुस-याचे अनुभव आपल्या कथानकात गुंफणा-या Svetlana या काही पहिल्या लेखिका नाहीत. पण त्यांची या विषयाशी असलेली समरसता पाहून त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. २०व्या शतकातील भीषण आपत्तींमधून वाचलेल्या, दबलेल्या, अपमानित झालेल्या लोकांचे जग Svetlana यांच्या

पुस्तकांमधून भेटते. खरा लेखक आपला युगधर्म पाळत असतो. समाजात जे-जे काही घडते त्याचे प्रतिबिंब त्याच्या लिखाणात उमटते. Svetlana यांच्या लिखाणाला हा निकष पूर्णतः लागू पडतो. त्यामुळेच त्यांच्या लिखाणाला अभिजातता आली आहे आणि त्यांना रशियन वाङ्मय परंपरेतील दोस्तोयवस्की आणि चेकॉव्ह यांचे वारस बनवले आहे. Svetlana यांच्या बाबतीतील विरोधाभास असा की, त्यांची काही पुस्तके यशस्वी झाली असली तरी, ही मानवतावादी लेखिका मानवतेप्रतीच्या तिच्या आस्थेची बूज न राखणा-या देशात फारशी कुणाला ठाऊक नाही. तिच्या सख्ख्या बांधवांनाही तिच्यात फारसा रस नाही. Svetlana यांच्या पुस्तकांच्या खपाचे आकडेही यथातथाच आहेत. काही पुस्तके तर आजमितीस उपलब्धही नाहीत.

आता, स्विडिश अकादमीने Svetlana यांच्यासारख्या लेखिकेला साहित्याचा नोबेल पुरस्कार देऊन एक पाऊल पुढे टाकले आहे. आपल्या मर्यादा पुरेपूर ठाऊक असूनही समाजमने तपासून पाहायला आवडणा-या लेखकांनाही साहित्यविश्वात जागा हवीच की. Svetlana यांचे काम अवघड होते. जे-जे घटनाक्रम तेथील राज्यकर्त्यांनी जनतेच्या मनातून कायमचे पुसून टाकण्याचे प्रयत्न केले त्या घटनाक्रमांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. आपले लिखाणही त्यांनी स्थानिक रशियन भाषेतच केले. Minsk शहराच्या मध्यवर्ती भागातील एका नऊ मजली इमारतीत गेली कित्येक वर्षे त्यांचे वास्तव्य आहे. Minskमध्ये दोन वर्षांपूर्वी स्थायिक होण्यापूर्वी जवळ-जवळ १२ वर्षे त्या युरोपमध्ये वास्तव्याला होत्या. लिखाणासाठी शिष्यवृत्ती मिळावी म्हणून त्यांनी इटली, जर्मनी, फ्रान्स, स्वीडन या देशांत वास्तव्य केले. बेलारूसचे सध्याचे हुकूमशहा Alex Lukashenko यांची कारकीर्द संपेपर्यंत आपल्या देशात पाऊल न टाकण्याचा त्यांचा निर्धार होता. पण ही हुकुमशाही संपुष्टात येण्याची काही चिन्हे दिसेनात तेव्हा आपला निर्धार बाजूला ठेवून Svetlana पुन्हा बेलारूसला परतल्या.

बेलारूसला परतण्याच्या सुमारासच त्यांनी आपले सर्वांत महत्त्वाचे आणि महत्त्वाकांक्षी पुस्तक ‘Second-hand Time’ प्रसिध्द केले. तेथील जनतेच्या तोंडून त्यांना जो मौखिक इतिहास समजला, त्याच्या आधारे सोव्हिएत आणि विघटनोत्तर संघराज्ये समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी या



पुस्तकात केला आहे. दरम्यानच्या काळात त्यांनी स्वतःची ओळखही मुळापासून बदलताना पाहिली. ‘‘रशियात कधीच न राहिलेली परंतु रशियन भाषेत साहित्यनिर्मिती करणारी’’, अशीच Svetlana यांची ओळख आहे. त्यांच्या पुस्तकांमधून आणि जगण्यातून त्यांनी सत्ताधा-यांविरोधात एक चळवळ उभी केली. ‘मला मानवतावादी रशियन जग आवडते; पण, Beria, Stalin आणि Shoigu यांचा रशिया मला अजिबात आवडत नाही’, असे त्या नेहमी म्हणतात.

नोबेल पुरस्कारासाठी एखाद्या पत्रकाराची निवड करणे ही स्विडिश अकादमीच्या आजवरच्या इतिहासातील एकमेव घटना म्हणावी लागेल. या आधी अकादमीने बर्ट्रंड रसेल, विन्स्टन चर्चिल, ज्याँ पॉल सार्त्र यांच्या अ-वाङ्मयीन लिखाणाला पुरस्कार दिले असले तरी Svetlana यांच्या लेखनाची प्रकृती भिन्न आहे. वास्तव हे कल्पितापेक्षाही अधिक उल्लेखनीय आणि चित्तवेधक असू शकते, हेच जणू Svetlana यांच्या लेखनाला हा पुरस्कार देऊन अकादमीने दाखवून दिले आहे. अर्थात, या निवडीमागे राजकारण हे असणारच. कारण, राजकारण हा या पुरस्काराचा एक भाग आहे. या पुरस्काराची घोषणा झाल्यावर Oleg Kashin या रशियन पत्रकाराची प्रतिक्रिया खूपच बोलकी होती. “नोबेल पुरस्काराने Svetlana यांच्या पुतीनविरोधातील आवाजाची धार आता आणखी वाढली आहे’’, हे त्यांचे उद्गार या संदर्भात लक्षणीय ठरतात.

रशियाच्या टीकाकाराला पुरस्कार देऊन पाश्चात्य जगाने या देशाच्या धोरणांवर एका अर्थी कोरडे ओढलेही असतील. परंतु, पाश्चात्य देशांच्या त्या अप्रत्यक्ष टीकेपेक्षा Svetlana यांची टीका वेगळ्या प्रकारची आहे. त्यांच्या लेखनातून उमटणारा आवाज हा समाजातील सामान्य माणसांचा हुंकार आहे. सोव्हिएत रशियाचा शतकभराचा इतिहास म्हणजे त्या लोकांचा दडपलेला आवाज आहे. Svetlana यांनी त्या दडपलेल्या आवाजाला आपल्या लिखाणातून वाचा फोडली. नोबेल पुरस्कार बहाल करून स्विडिश अकादमीने Svetlana यांच्या प्रामाणिक धडपडीचा सन्मान करण्याबरोबरच त्या लेखनाची ओळख जगाला करून देण्याची बहुमोल कामगिरीही बजावलेली आहे. ■■

**सामाजिक**

# ... याला 'माणूस' ऐसे नाव !

'माणूस कसा आहे, त्याचे स्वरु प नक्की कसे आहे ?', या प्रश्नांचे उत्तर बरेच जण, 'उंच, सरळ, दोन पायांवर चालणारा, बोलका, बुध्दिमान, भौतिक सुखांसाठी धडपडणारा...' असे काहीसे देतील. पण हे झाले माणसाचे फारच ढोबळ वर्णन ! माणसाची आणखी सूक्ष्मात जाऊ न व्याख्या करायची झाल्यास काय म्हणता येईल? काही लोकांच्या मते माणसाची अशी काही सविस्तर, सूक्ष्म संकल्पना मांडताच येत नाही. त्यांच्या मते जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. याच न्यायाने, प्रत्येक माणूस त्याचे वैयक्तिक आणि सांस्कृतिक वेगळेपण दाखवत असतो. पण प्रत्यक्षात माणसाला इतर प्राण्यांपासून वेगळी प्रजाती म्हणून ओळख देणारी; भावना, वर्तन, विचार यांसारख्या बाबतींतील त्याचे वेगळेपण सिध्द करणारी काही खास वैशिष्ट्ये असतात. म्हणजे, समजा उद्या एखादा परग्रहवासी पृथ्वीवर आला तर, आपल्याला 'माणूस म्हणून ओळखले जावे यासाठी तो कोणते निकष लावेल ? आता, या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तर, आपली 'माणूस' म्हणून असलेली वैशिष्ट्ये आपण काय सांगू शकू याचाच प्रथम विचार करणे भाग ठरते.

आपण स्वतः माणूस असूनही 'माणूसपण' म्हणजे नक्की काय हे आजवर अचूकपणे सांगू शकलेलो नाही. मानववंशशास्त्रज्ञांनी पृथ्वीवरील सर्व मानवप्राण्यांची काही वैशिष्टये अधोरेखित केलेली आहेत. इतर प्रजातींना ओळखण्यासाठी त्यांना त्यांच्या वैशिष्ट्यांची मोजपट्टी जशी आपण लावतो, तशीच मानववंशशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या वैशिष्ट्यांची मोजपट्टी लावून माणसाचे 'माणूसपण' जर अधोरेखित केले तर 'माणूस' म्हणजे नक्की काय, याचे वर्णन करता येईल का?

**खेळकरपणा :**

निसर्गात फक्त माणसालाच खेळ आवडतात असे नाही. सर्व सस्तन प्राणी खेळतात. काही पक्षी आणि इतर प्राणीही खेळतात. पण



माणसाव्यतिरिक्त इतर कुठलीच प्रजाती खेळण्यात त्यांच्या आयुष्याचा फार मोठा वेळ व्यतीत करत नाहीत. माणसाला खेळ, संगीत, विनोद, आदरातिथ्य, केशरचना, नृत्य, कला यांसारख्या अवांतर गोष्टींमधून आनंद मिळतो. तो साधनांबरोबर जसा खेळतो तसा भाषेबरोबरही खेळू शकतो. शब्दांच्या पलीकडला सांकेतिक अर्थही त्याला समजू शकतो. माणसाच्या खेळातील विलक्षण भाग म्हणजे त्याचा कल्पनाविलास, असे कॅलिफोर्निया विद्यापीठातील Francis Steen म्हणतात.

लहान मूल खेळकर असते. पण वय वाढल्यानंतरही माणसाचा खेळकरपणा संधी मिळाली की उफाळून येतो. खेळातील हा आनंद तो कुठल्याही वयात मिळवू शकतो. खेळांतून होणारी करमणूक, मिळणारा आनंद याचे प्रमाण माणसामध्येच सर्वाधिक का, याचे उत्तर देताना ॲटलांटातील Emory विद्यापीठातील संशोधक Frans de Waal म्हणतात की, ज्या प्राण्यांच्या आयुष्यात स्थिरता आहे तोच प्राणी अशा प्रकारचा आनंद घेऊ शकतो. मानवी समाजात नैतिकतेचे, वर्तनाविषयीचे नियम ठरलेले असतात. त्यामुळे माणसाच्या जीवनात स्थैर्य असते. ज्या प्राण्यांच्या आयुष्यात शिकार करणे, भक्ष्य पकडणे, शत्रूपासून सुरक्षित राहणे यांसारख्या विवंचना असतात, ते सदोदित खेळकर कसे राहू शकणार? याचे उदाहरण देताना Waal म्हणतात, "जंगलात राहणारे प्रौढ चिम्पांझी दिवसाचे आठ तास अन्न मिळवण्यासाठी धडपडत असतात. परंतु, पिंज-यात राहून निवांत आयुष्य जगणारे त्यांचेच भाऊबंद मात्र संगणकावर खेळ खेळताना दिसतात, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम ते पाहतात, शाब्दिक विनोदाचाही आनंद ते घेतात."

कोलोरॅडो विद्यापीठातील Marc Bekoff यांच्या प्रतिपादनानुसार खेळांचा उगम हा उत्क्रांतीतून झाला असावा. परिसरातील वातावरणात तग धरू न राहण्यासाठी माणसाने आत्मसात केलेले ते कौशल्य आहे. खेळ केवळ मजा घेण्यासाठी नसतो. खेळाच्या माध्यमातून माणसाचा शारीरिक, बौध्दिक आणि सामाजिक विकास तर होतोच शिवाय त्याला परिस्थितीशी दोन हात करण्याचे प्रशिक्षणही मिळते. Bekoff यांना वाटते की, सामाजिक विकास हा खेळाचा सर्वाधिक महत्त्वाचा उद्देश

आहे. कारण, खेळांना नैतिकतेचे अधिष्ठान असते. लहान मुलांचा खरा सामजिक विकास खेळांमधूनच होत असतो. ऑक्सफर्ड विद्यापीठातील Robin Dunbar यांच्या म्हणण्याप्रमाणे, "सामाजिकीकरणासाठी खेळ खेळणे खूप गरजेचे आहे. खेळताना आपण, मोठ्याने हसतो, मोकळे होतो. त्यामुळे लोकांना एकत्र आणण्याचे ते उत्तम साधन आहे. सांघिक खेळांत एकमेकांत ताळमेळ राहतो. त्यातून विधायक मनोवस्था निर्माण होण्यास मदत होते. आपल्यामध्ये जी स्पर्धेची उर्मी असते तिचा निचरा होण्यास खेळांमुळे मदत होते." थोडक्यात काय तर, खेळातून निखळ आनंदाबरोबरच सामाजिक विकासही साधला जातो. म्हणूनच खेळ किंवा खेळकरपणा हा माणसाचा स्थायीभाव आहे.

**विज्ञाननिष्ठा :**

अगदी गर्भावस्थेपासूनच आजुबाजूच्या जगाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न माणूस करत असतो. घटना अशा का घडतात, या विषयी ठोकताळे मांडायचे आणि ते बरोबर आहेत का हे पडताळून पाहायचे, ही माणसाची कृती हा विज्ञानाचा मूलाधार आहे. आयोवा विद्यापीठातील संशोधक Edward Wasserman म्हणतात, "विज्ञान म्हणजे अवतीभवतीच्या जगाला समजून घेणे. माणसाव्यतिरिक्त अन्य प्राण्यांनाही त्यांच्या अस्तित्वासाठी वैज्ञानिक विचारांची गरज असतेच. पण माणसाची विज्ञाननिष्ठा पदोपदी व्यक्त होत असते. कुठल्याही घटनेचा अर्थ लावताना 'का' हा प्रश्न विचारण्याची उर्मी फक्त माणसामध्येच असते."

Lousiana विद्यापीठातील Daniel Povinell यांनी या संदर्भात एक प्रयोग केला. त्यांनी चिम्पांझी आणि मुले दोघांनाही L आकाराच्या ठोकळ्याच्या कडांवर उभे राहण्यास शिकवले. त्या नंतर त्यांनी त्या जागी त्याच्या सारखाच दिसणारा परंतु एका जागी स्थिर न राहणारा ठोकळा गुपचुपपणे ठेवला. त्या ठोकळ्यावर चढण्याचा चिम्पांझी प्रयत्न करत राहिले. पण मुलांना उभे राहता येईना तेव्हा त्यांनी तो ठोकळा उलटा केला. त्याची खालची बाजू तपासली. त्याच्या आत काय असेल याचा अंदाज घेतला. आपण त्याच्यावर उभे का राहू शकत नाही याचा हरप्रकारे शोध घेण्याचा प्रयत्न मुलांनी केला.



आपल्या तार्किकतेच्या जोरावर माणूस वेगवेगळे निष्कर्ष काढू शकतो आणि त्यातून मिळालेले ज्ञान, कौशल्ये यांचा वापर दुस-या घटना समजून घेण्यासाठी करू शकतो. माणसाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याला मिळालेले ज्ञान, लागलेला शोध जगाला ओरडून सांगण्याचा उतावीळपणा फक्त त्याच्याचकडे असतो.

**कायदे करणे**:

प्रत्येक मानवी समाजात औपचारिक कायदे नसले तरी, आचार-विचारासंबंधी काही नियम आहेत. असे नियम इतर कुठल्याही प्राण्यांमध्ये आढळत नाहीत. काही प्रगत सस्तन प्राण्यांमध्ये, त्यांच्या टोळीमध्ये सामंजस्य राखण्यासाठी साधे सोपे नियम असतीलही, पण आपल्या भाषिक कौशल्याच्या आणि प्रगत मेंदूच्या आधारावर अतिशय सुव्यवस्थित नियमावली तयार करणे आजवर केवळ मानवालाच शक्य झाले आहे. समाजनियमनासाठी त्याने काही शिष्टाचार ठरवले. संकेत निश्चित केले. प्रत्येक समाजाचे नियम वेगवेगळे असले तरी, प्रत्येक समाजात काही मूलभूत नियम असतातच. नातेसंबंधांविषयक कायदे, हे त्याचे केवळ एक उदाहरण. 'लग्न' ही संस्था यात मुख्य भूमिका बजावते. त्यामुळे वारस ठरवताना आईकडचे नातेसंबंध आणि वडिलांकडचे नातेसंबंध या विषयी प्रत्येक समाजाचे नियम असतात. कधी ते आईकडच्या संबंधांना प्राधान्य देतात तर कधी वडिलांकडच्या नातेसंबंधांना.

**रसनातृप्ती :**

अन्य प्राण्याच्या तुलनेत माणूस खाण्यापिण्याचा षौकीन आहे. इतर प्राणी निसर्गातील नैसर्गिक अवस्थेतील अन्न सेवन करतात. पण माणूस मात्र या नैसर्गिक घटकांपासून आपले वेगळे अन्न तयार करतो. अन्न शिजवून खाणे हा माणसाच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील एक क्रांतिकारी शोध आहे. हार्वर्ड विद्यापीठातील संशोधक Richard Wrangham म्हणतात की, शिजवलेल्या, कमीत कमी चावावे लागणा-या पण त्याचबरोबर जास्त उष्मांक देणा-या पदार्थांचा शोध माणसाने लावला. हा एक महत्त्वाचा शोध होता. हे अन्न सेवन केल्याने आपल्या पूर्वजांच्या मेंदूचा विकास झाला आणि आजचा बुध्दिमान मानवप्राणी घडण्यास मदत झाली.

चिम्पांझी दिवसाचे सहा तास अन्न चर्वण करण्यात घालवतात. पण माणसाला यासाठी दोन तासांपेक्षाही कमी वेळ लागतो. उरलेला वेळ तो आपल्या सांस्कृतिक उन्नतीसाठी वापरतो. माणसाने निर्माण केलेली खाद्यसंस्कृती हा त्याचाच एक परिपाक आहे. तो अन्नघटकांवर प्रक्रिया तर करतोच पण त्याच वेळी अन्नाची देवाणघेवाण करत, कुटुंबियांसोबत ते सेवन करायला त्याला अधिक आवडते. इतर प्राण्यासारखे एकट्याने खाणे त्याला रुचत नाही. अन्य प्राण्यांमध्ये अन्न मिळवणे आणि त्याचे सेवन करणे हा त्यांचा दिवसभराचा कार्यक्रम असतो. Wrangham म्हणतात, "चिम्पांझींसारखे प्राणी खाण्यासाठी अधूनमधून एकत्र येतही असतील पण आपण माणसे मात्र दिवसातून एकदा तरी कुटुंबासोबत एकत्र जेवण करतोच." माणसाच्या खाद्यसंस्कृतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हे अन्न शिजवण्याचे काम बहुतेक समाजात स्त्रीकडेच करते. याचे नक्की कारण माहिती नसले तरी सुरुवातीपासूनच संरक्षण पुरवण्याच्या बदल्यात स्त्रीने अन्न रांधून पुरुषांना वाढावे अशी कामांची वाटणी झालेली असावी. शिवाय, मुलांच्या संगोपनानेही महिलांना घराशी बांधून ठेवले असावे.

वेगवेगळ्या पदार्थांनी रसनातृप्ती करण्याची आवड माणसाला असतेच, पण त्याचबरोबर इतरांनाही खाऊ घालण्याची आवड त्याला असते. त्याला त्यासाठी फक्त काही तरी निमित्त हवे असते. प्रत्येक मानवी समाजात ही संस्कृती आहेच. Wrangham यांच्या मते दुसऱ्याला खाऊ घालण्यात स्वतःच्या प्रतिमानिर्मितीचाही भाग असावा. आजच्या काळात तर या खाद्यसंस्कृतीला आणखी वेगवेगळी परिमाणे लाभली आहेत.

इतर प्राण्यांचा विचार करता माणसासाठी अन्नसेवन हे उदरभरणापेक्षा बरेच काही आहे. Utah विद्यापीठातील मानववंशशास्त्रज्ञ Polly Wiessner यांच्या मते एकत्र बसून अन्नाचे सेवन करणे हा सर्व मानवी संस्कृतींमध्ये सामाजिक बंध दृढ करण्याचा भाग आहे. या एकत्र येण्याने मित्र आणि सहकारी जोडले जातात. वेगवेगळे समूह एकत्र येतात. पण एकत्र जेवण हा घटक जसा आपल्याला जवळ आणतो, तसाच तो दूरही सारतो. प्रत्येक संस्कृतीच्या जेवणाखाणाच्या स्वतंत्र चालीरीती असतात. त्या माणसांमध्ये 'आपण' आणि 'ते' असा भेदभाव उत्पन्न करू



शकतात. प्रांतानुसार जशी भाषा बदलते तशा पदार्थांच्या, जेवणाच्या परंपराही बदलतात. त्यामुळेच, तुम्ही काय खाता याच्यावरूनच तुमची ओळख होत असते. थोडक्यात काय तर, माणसाइतकी प्रगल्भ खाद्य संस्कृती प्रगत अशा चिम्पांझीमध्येही पाहायला मिळत नाही.

**चुगलीखोरपणा :**

भाषा ही माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. आजच्या माणसाला एक प्रकारे त्याच्या भाषेनेच घडवले आहे. शिक्षणापासून ते अगदी लोककथा, वैद्यक, व्यापार आदी सर्व मानव व्यवहारांच्या केंद्रस्थानी भाषा आहे. त्यामुळे साहजिकच या भाषेचा वापर प्रसंगी चुगलखोरीमध्येही होत असतो.

काहीही कारण नसताना दुसऱ्यांविषयी आपली मते व्यक्त करणे हे फक्त माणसांमध्येच दिसून येते आणि लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ही मते नेहमीच उथळ आणि/अथवा मूर्खपणाची असतात, असे नव्हे. काही मानववंशशास्त्रज्ञांच्या मते, इतरांनी कसे वागावे हे ठरवण्यासाठी आपण चुगली करतो. त्यामुळे चुगली ही कायम ज्या व्यक्तीविषयी बोलायचे त्या व्यक्तीच्या कानावर जाईल अशा पध्दतीनेच केली जाते. पण चुगली ही कायमच नावे ठेण्यासाठी केली जात नाही. बऱ्याचदा दोषारोप करणाऱ्या विधानांपेक्षा निरुपद्रवी विधानेच चुगलीमध्ये अधिक प्रमाणात असतात. काही संशोधकांच्या मतानुसार चुगली करणे हा सामाजिक नातेसंबंध वाढवण्याच्या प्रक्रियेतीलच एक भाग आहे. आपले सामाजिक नातेसंबंध आता इतके विस्तारले आहेत की, प्रत्येक नाते त्याला वेळ देऊन घडवणे वेळखाऊपणाचे आहे. त्यामुळे आपल्याला इतर नातेसंबंधांकडून जे अपेक्षित असते ते चुगल्यांच्या माध्यमातून साध्य करण्याचा मार्ग माणसाने बहुधा निवडला असावा. Wiessner यांच्या विश्लेषणानुसार, चुगली करणे ही मानवाला मिळालेली जणू एक देणगीच आहे. कलहारी वाळवंटासारख्या ठिकाणी आयुष्य इतके रुक्ष आणि कंटाळवाणे आहे की तेथील लोक कायम एकमेकांविषयी बोलूनच स्वतःचे मनोरंजन करत असतात. पुढे जाऊन ते असेही म्हणतात की, चुगलखोरीशिवाय कुठलाही समाज तग धरूच शकणार नाहीत. समाजातील प्रत्येकाला आवडणारे ते एकमेव विरंगुळ्याचे साधन आहे. यालाच माणूस ऐसे नाव ! ■■

नागरीकरण

# आता पर्व (उप)नगरीय वाढीचे...

बारकाईने न्याहाळले तर जगभरातील नागरीकरणाच्या वाढविस्तारात अलीकडील काही वर्षांत एक लक्षणीय असा गुणात्मक बदल घडून येतो आहे. नागरी वाढविस्ताराचे संख्यात्मक परिमाण रोडावते आहे, असा याचा अजिबातच अर्थ नाही; परंतु, शहरांच्या संख्यात्मक वाढीचे भौगोलिक प्रसरण काही एक विशिष्ट रंगरूप धारण करताना दिसते आहे, हे नक्की. नानाविध कारणांपायी आपले गाव सोडून शहरांकडे धाव घेण्याची देशोदेशींच्या नागरिकांची प्रवृत्ती आजही सर्वत्रच बळजोर आहे. परंतु, नागरी विभागांकडे वळणारी ती पावले डोक्यावरील छप्पर शोधण्यासाठी मात्र धाव घेतात ती मोठ्या शहरांच्या मेरेपलीकडे असणा-या अर्धनागरी परिसरांच्या दिशेने; आपला मूळचा ग्रामीण बाज टिकवून धरत शहरी संस्कृतीच्या खुणा अंगोपांगी खेळवणा-या उपनगरी प्रदेशांकडे. दुस-या शब्दांत सांगावयाचे तर, नागरीकरणाच्या आजवरच्या आगेकूचीमध्ये आता पर्व येऊ पाहते आहे ते उपनगरीय वाढविस्ताराचे. विकसित आणि विकसनशील अशा, जगाच्या उभय पट्ट्यांतील मोठ्या शहरांपेक्षा त्या शहरांच्या झालर क्षेत्रांचीच लोकसंख्यात्मक वाढ अलीकडील काळात अत्यंत झपाट्याने घडून येत असल्याचे दृश्य अनुभवास येते आहे. म्हणजेच, उपनगरीय वाढविस्ताराची ही प्रक्रिया जवळपास सार्वत्रिक स्वरूपाची आहे.

नागरीकरणाच्या वाढविस्ताराची परंपरा आणि इतिहास तसा खूपच प्राचीन असला तरी उपनगरांचा विकास व उपनगरीय विस्तार ही तशी अलीकडील बाब होय. साधारणपणे १९व्या शतकाच्या आगेमागे हे वास्तव आकारास आले. वाहतुकीचे तंत्रज्ञान आणि वाहतुकीच्या साधनांमध्ये घडून आलेल्या अप्रतिहत सुधारणांचे ते वास्तव म्हणजे अपत्य ठरले. प्रथमतः रेल्वे आणि नंतर अनुक्रमे बस व मोटरगाड्यांनी शहरांचे नाभीस्थान आणि त्या त्या शहरांचे झालर क्षेत्र यांच्यादरम्यानच्या अंतराचा अंत घडवून आणला.



उगमापासूनच उपनगरांचे व्यक्तिमत्त्व मूळ शहरापेक्षा गुणात्मकरीत्या भिन्न राहिलेले आहे. दिवसभराच्या धकाधकपूर्ण धावपळीनंतर रात्रीच्या निवांत वास्तव्याचे ठिकाण म्हणूनच उपनगरांकडे पाहिले गेले. म्हणजे, उपजीविकेचे स्थान हे उपनगरांचे प्रधान लक्षण फारसे कधीच नव्हते. केवळ शांत परिसर, निवांत जीवनशैली, मुख्य शहरातील धावपळ, गर्दी, गजबजाट, धूर, आवाज, प्रदूषण यांचा उपसर्ग पोहोचू न देणारे स्थान म्हणूनच उपनगरे विकसित झाली. साहजिकच, भरपूर झाडे, मोकळे व प्रशस्त रस्ते, मुख्य शहरांच्या तुलनेत मोठी व आरामदायी घरे असेच उपनगरांचे अंतरंग आजवर राहत आलेले आहे.

परंतु, २००८ साली अमेरिकेमध्ये उद्भवलेल्या वित्तीय दणक्यापायी सर्वांत प्रथम उपनगरेच हादरली तीही नेमकी याचमुळे. खास करून अमेरिकी नगरांच्या व्यवस्थेत नव्यानेच भरभराटीस आलेल्या उपनगरांची अवस्था २००८ सालापासून घोंघावणा-या मंदीच्या वावटळीमुळे फारच दयनीय बनली. भरभक्कम कर्जे काढून उभारली गेलेली घरे झपाट्याने ओस पडू लागली. कर्जांची परतफेड थकल्याने त्या घरांवर आच आली. टुमदार, आकर्षक घरे एका मागोमाग एक लिलावात निघू लागली. उपनगरांमध्ये बहरलेला बांधकाम व्यवसाय कणा मोडून पडल्यागत झाला. परिणामी, त्याच पायावर बेतलेला अेमरिकी उपनगरांचा वित्तीय पाया पार खचून गेला. सॅनफ्रान्सिस्कोच्या परिसरातील स्टॉकटोन हे, दिवाळखोरी जाहीर करणारे अमेरिकेच्या इतिहासातील अलीकडचे एक मोठे शहर (वस्तुतः उपनगर) म्हणून जगापुढे आले ते २०१२ साली.

अमेरिकी 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटल्यानंतरच्या अलीकडील काही वर्षांत खास करून अमेरिकी तरूणांची पसंती उपनगरांकडून पुन्हा एकवार मुख्य शहरांकडे वळत असल्याचे चित्र दिसते. एक तर, रोजगार शोधणा-या अशा तरूणांना परवडण्याजोग्या छोटेखानी सदनिका मुख्य शहरांतच उपलब्ध होतात. ट्रामसारखी सार्वजनिक वाहतूक सुविधाही हाताशी असते. परिणामी, पूर्वापारची मोठी शहरे पुन्हा एकवार गजबजत आहेत. असे असले तरीही अमेरिकी लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी लोकसंख्या उपनगरांतच सामावलेली आहे. अर्थात, स्वखुषीनेच !

परंतु, म्हणून उपनगरांच्या वाढविस्ताराला ओहोटी लागलेली आहे, असा निष्कर्ष जर अलीकडील ही प्रवृत्ती बघून कोणी काढायला जाईल तर ती मात्र एक घोडचूकच ठरेल. मुख्यतः उपनगरांकडे होणारे स्थलांतर आणि त्यांपायी लोकसंख्यावाढीने फुगत असलेली उपनगरे हे आजचे वैश्विक वास्तव आहे. अगदी आपल्या देशातही हाच कल बळकट बनतो आहे. महानगरी चेन्नई हे त्याचे जितेजागते उदाहरण. २००१ ते २०११ या गेल्या दशकभरादरम्यान चेन्नई शहराच्या लोकसंख्येमध्ये भर पडली ती केवळ सात टक्क्यांची. त्या तुलनेत, चेन्नईच्या वळचणीला वसलेल्या चेंगलपट्टू या उपनगराची लोकसंख्या तब्बल ३९ टक्क्यांनी वाढली. मोटरगाड्यांच्या निर्मितीचे एक मुख्य केंद्र म्हणून चेन्नई आणि त्याचा परिसर उदारीकरणानंतर झपाट्याने वाहनउत्पादन उद्योगाच्या जागतिक नकाशावर उदयाला आलेले आहे. बलदंड अशा अनेक नामवंत मोटरउत्पादकांनी त्यांचे उत्पादन तळ चेन्नईच्या बाहेर परंतु नजीकच्या भूपट्ट्यांत उभारलेले आहेत. एकदा का रोजगारनिर्मितीचे स्त्रोत शहराबाहेर हलले की रोजगाराच्या शोधार्थ येणारे कर्मचारीही त्या मागोमाग तिकडेच प्रस्थान करणार हे ओघानेच आले. साहजिकच, या मोटरनिर्मिती उद्योगांत रोजीरोटी कमावणारे कामगारही चेन्नईच्या उपनगरांकडे वळले.

केवळ वाहननिर्मिती उद्योगच नव्हे तर, माहिती-तंत्रज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाधारित उद्योगानेही चेन्नईच्या परीघावरील उपनगरांत आपापले तळ थाटलेले आहेत. हा विस्तार झालेला दिसतो तो मुख्यतः चेन्नईच्या परिसरात दक्षिणेला. जागतिक बँकेने अलीकडेच मांडलेल्या एका हिशेबानुसार, चेन्नई शहराच्या नाभीकेंद्रापासून साधारणपणे २५ किलोमीटर अंतराच्या पट्ट्यात कार्यरत असलेल्या माहिती-तंत्रज्ञान व माहिती-तंत्रज्ञानाधारित उद्योगांमधील रोजगारांत १९९८ आणि २००५ या दोन कालबिंदूंदरम्यान जवळपास २७ टक्क्यांची वाढ घडून आलेली आहे. तर, मुख्य चेन्नई शहराच्या साधारणतः २५ किलोमीटर ते ५० किलोमीटर त्रिज्येच्या बाहेरील भूपट्ट्यात कार्यरत असलेल्या माहिती-तंत्रज्ञान व माहिती-तंत्रज्ञानाधारित उद्योगांमधील रोजगारांत त्याच कालावधीत ४७ टक्क्यांची भरघोस वाढ घडून आल्याचे संबंधित आकडेवारी दर्शवते.



उत्पादनप्रणालीमध्ये अतिशय उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरणारा वस्तुनिर्माण उद्योगही या प्रक्रियेत अजिबात पिछाडीवर नाही. तसे बघितले तर चेन्नई हे या उद्योगाचे पारंपरिक केंद्र. तरीही, चेन्नईमध्ये पूर्वापार कार्यरत असणा-या या उद्योगक्षेत्रातील रोजगार १९९८ आणि २००५ या कालावधीदरम्यान जवळपास २५ टक्क्यांनी घटला; तर, चेन्नईच्या उपनगरांत बस्तान हलवलेल्या याच उद्योगातील कारखान्यांत त्याच काळात २३ टक्क्यांनी रोजगारवाढ घडून आली. अर्थात, या प्रक्रियेचा एक परिणाम म्हणजे आता ही उपनगरेही प्रचंड प्रमाणात गजबजू लागलेली आहेत. त्याची परिणती चेन्नई आणि ही उपनगरे यांच्या दरम्यानच्या वाहतूक व्यवस्थेवर असह्य ताण निर्माण होण्यात घडून येते आहे. हे टाळायचे तर मुख्य शहर आणि त्याच्या कुशीतील उपनगरे यांच्यावर वाढणारा लोकसंख्येच्या केंद्रीकरणाचा ताण हलका करणारी मध्यम व लहान आकाराची नवीन नागरी केंद्रे त्यांच्या परिसरात विकसित करण्यावर नगरविकासाच्या धोरणाचा भर स्थिर होणे अत्यावश्यक ठरते. परंतु, आजही आपल्या देशात धोरणात्मक आघाडीवर त्या संदर्भात शासनसंस्थेकडून काहीच जागृती अथवा प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात असल्याचे दिसत नाही.

अर्थात, हे केवळ चेन्नईमध्येच घडते आहे असे नाही. मोहनगरी मुंबईची आजची स्थिती अशीच आहे. मुख्य वाढविस्तार मुंबईच्या उपनगरांतच हातपाय पसरतो आहे. हेच चित्र चिनी शहरांमध्येही दिसते. न्यूयॉर्क त्याच मार्गाने वाटचाल करते आहे. बीजिंग, पॅरिस, टोकियो या वैश्विक महत्त्वाच्या अन्य महानगरांची कथाही अजिबात वेगळी नाही. शहरांच्या मुख्य केंद्राकडून लोकसंख्येची पसरण दूरदूरच्या स्थानांकडे होत असल्याने मुख्य शहरांमधील लोकसंख्येची घनता अलीकडील काही वर्षांत लक्षणीयरीत्या घटलेली आहे. या सगळ्या वाढविस्तारात एक सामाजिक-आर्थिक स्थित्यंतर अनुस्युत आहे. सर्वसाधारण सुबत्तेची कमान सरासरीने जसजशी उंचावत जाते तसतशी लोकांना पूर्वीपेक्षा अधिक जागेची गरज भासू लागते. आर्थिक स्तर उंचावला की ऊर्जा, अन्न, अन्य वस्तू व सेवा यांच्या उपभोगाची सरासरी मात्रा जशी उंचावते तशीच वाढती सुबत्ता अधिक वाढीव क्षेत्राची मागणी करते. आजच्या उपनगरीय वाढीला हाच न्याय लागू होतो ! ■■

# प्रसुती‘कळा’

फार नाही, अगदी वीस एक वर्षांपूर्वीपर्यंत आपल्याकडे नैसर्गिक प्रसुती होण्याचे प्रमाण चांगल्यापैकी अधिक होते. पण गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती अगदी उलट झाली आहे. म्हणजे ‘सिझेरियन’ किंवा ‘सी-सेक्शन’ होण्याचे प्रमाण जास्त आणि नैसर्गिक प्रसुती होण्याचे प्रमाण कमी अशी आजची परिस्थिती आहे. आजकाल सर्रास होणारी सिझेरियन पाहिली की ब-याच जणांच्या भुवया उंचावतात. काही जण त्याचा दोष डॉक्टरांच्या अधिकाधिक पैसे लाटण्याच्या वृत्तीला देतात, तर काही आजकालच्या मुलींची जीवनशैली, त्यांच्या आरोग्यविषयक समस्या यांना दोष देतात. पण खरी परिस्थिती नक्की काय आहे, ही परिस्थिती आपल्याकडेच आहे की जगभरातील इतर देशांमध्येही जवळपास आपल्यासारखेच चित्र आहे, हे जाणून घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

आपल्या इतर सस्तन भावंडांप्रमाणेच माणूसही अगदी अलीकडेपर्यंत नैसर्गिक पध्दतीनेच अपत्याला जन्म देत होता. या प्रक्रियेत गुंतागुंत निर्माण झाली तर कधी माता दगावत असे तर कधी मूल दगावत असे. प्रसुतीमध्ये आई किंवा मूल दगावण्याचे प्रमाण पूर्वीच्या काळी फार मोठे होते. या समस्येवर उपाय म्हणून १९ व्या शतकाच्या मध्यावर शस्त्रक्रिया करून बाळाची आणि आईची सुटका केली जाऊ लागली. ही शस्त्रक्रिया आज ‘सिझेरियन’ किंवा ‘सी-सेक्शन’ या नावाने ओळखली जाते.

ज्या प्रसुती अवघड आहेत, ज्यात आई किंवा बाळ यांच्या जिवाला धोका आहे अशा शक्यतांच्या वेळी शस्त्रक्रियेचे हे तंत्र वापरले जात असे. ज्या प्रसुती सुकर आहेत त्यांच्याबाबतीत शस्त्रक्रियेचा पर्याय निवडणे नैतिकदृष्टया अनुचित मानले जाई. कारण, कुठलेही आधुनिक तंत्र त्याच्या फायद्यांबरोबरच काही तोटेदेखील घेऊन येत असते. या शस्त्रक्रियेचा अभ्यास असे सांगतो की, ही शस्त्रक्रिया स्त्रियांना कमजोर करणारी असते. काही महिलांच्या बाबतीत या शस्त्रक्रियेमुळे मेंदूमध्ये रक्तस्राव



होणे, रक्तात गुठळ्या तयार होणे किंवा आतड्यांचे विकार संभवणे यां सारखे मोठे धोकेही संभवतात. काही स्त्रियांच्या मूत्राशयाला जंतुसंसर्ग होऊन त्याला इजा होते. अपत्यांच्या दृष्टीनेही ही शस्त्रक्रिया हितकारक नसते. मातेच्या पोटी नैसर्गिकरित्या जन्म घेणा-या अपत्यांच्या तुलनेत, शस्त्रक्रियेद्वारे या जगात प्रवेशलेल्या अपत्यांमध्ये प्रतिकारक्षमता कमी असते. त्यामुळे अशा अपत्यांना अस्थमा, ॲलर्जी, स्वमग्नता किंवा स्थूलत्व यांसारखे विकार होण्याची शक्यता असते, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे प्रतिपादन आहे.

लंडन येथील विख्यात प्रसुतिशास्त्रतज्ज्ञ Michael Ordent यांनी आपल्या ‘Childbirth and the Future of Homo Sapiens ’ या पुस्तकात म्हटले आहे की, ‘सी-सेक्शन’मुळे उद्‌भवणा-या आजारांचा आणि या शस्त्रक्रियेचा तार्किकदृष्टया काही संबंध वाटत नसला तरी, या शस्त्रक्रियेमध्ये भूलीची जी औषधे, वेदनाशामक औषधे आणि सिंथेटिक ऑक्सिटोनिन यांचा वापर केला जातो, त्यामुळे हे आजार होण्याची दाट शक्यता असते. काही संशोधकांचे म्हणणे असे आहे की, ज्या अपत्यांच्या जन्मासाठी शस्त्रक्रियेचा पर्याय योजला जातो, त्यांना ‘Immunity Boosting Microbes’ चे सुरक्षाकवच मिळत नाही. नैसर्गिकरित्या जन्मणारे मूल हे कवच लपेटूनच या जगात प्रवेश करते. त्याला जन्मजात मिळालेले हे वरदान असते. याखेरीज काहींचे म्हणणे असेही आहे की, नैसर्गिक प्रसुतीमध्ये बाळ आणि आई यांच्यामध्ये तत्काळ जवळिकीचे बंध निर्माण होतात. अर्थात, या विविध प्रतिपादनांची शहानिशा अद्याप व्हावयाची आहे, हेही तितकेच खरे.

या सर्व गोष्टींचा विचार केला तर कुणालाही असेच वाटेल की, कुठलीही स्त्री प्रसुतीसाठी शस्त्रक्रियेचा पर्याय शक्यतो निवडणारच नाही. परंतु, वास्तवातील परिस्थिती याच्या बरोबर अगदी उलट आहे. अलीकडच्या काही दशकांत ‘सिझेरियन’चा पर्याय निवडणा-या गरोदर स्त्रियाचे एकूणांतील प्रमाण जगभरात सर्वत्रच लक्षणीयरीत्या वाढल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येत. सध्या हे प्रमाण स्वीडनमध्ये १२ टक्के, अमेरिका ३२ टक्के, इराण ४१ टक्के आणि ब्राझील ५२ टक्के असे असल्याचे

दिसते. ही झाली अन्य देशांतील केवळ काही ठळक उदाहरणे. भारतात हे प्रमाण राष्ट्रीय पातळीवर सरासरीने नऊ टक्के इतकेच असले तरी राज्यपातळीवर मात्र राज्याराज्यांत डोळ्यांत भरण्याजोगी तफावत अनुभवास येत. उदाहरणच द्यायचे झाले तर, आपल्या देशातील तामिळनाडू आणि केरळ या दोन राज्यांमध्ये शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती होण्याच्या प्रमाणाने छातीमध्ये धडकी भरावी अशी पातळी गाठलेली आहे. या दोन्ही राज्यांत 'सिझेरियन'द्वारे प्रसुती होण्याचे प्रमाण जवळपास ६० टक्क्यांपर्यंत उंचावलेले आहे. येत्या काळात ते आणखी वाढण्याची शक्यता आहे. जागतिक आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या मर्यादेनुसार, 'सिझेरियन'द्वार होणा-या प्रसुतींचे एकूणांतील प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये. तरीही, विविध देशांतील 'सिझेरियन'चे हे वाढते प्रमाण एक प्रकारे धोकादायक कलच दर्शवते. या शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढण्याची कारणे बरीच आहेत. एक तर, या शस्त्रक्रियेला नैसर्गिक प्रसुतीच्या दुप्पट खर्च येतो. त्यामुळे खाजगी रुग्णालयांची प्रवृत्ती त्या शस्त्रक्रिया अधिक प्रमाणात करण्याकडे असते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे आजकालचे प्रसुतीतज्ज्ञ हे Forceps किंवा Ventouse यांसारख्या पर्यायी उपचारपध्दतींमध्ये पारंगत नसतात. त्यामुळे जरा अवघड परिस्थिती दिसली की ते लागलीच शस्त्रक्रियेचा आधार घेतात. शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढण्यामागील तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, सांपत्तीक स्थिती उत्तम असणा-या स्त्रिया प्रसुतीच्या वेणांमधून लौकरात लौकर सुटका करून घेण्यासाठी शस्त्रक्रियेचा पर्याय निवडतात. आजकाल ब-याच स्त्रियांना त्यांचे पहिले अपत्य वयाच्या तिशीमध्ये होते. त्यामुळे त्यांना प्रसुतीच्या वेळी कोणताही धोका पत्करायचा नसतो.

या शस्त्रक्रियेशी संबंधित काही तोटेही तज्ज्ञ ध्यानात आणून देतात. सध्या समाजात 'निसर्ग विरुध्द तंत्र' असा नवा वाद सुरू आहे. नैसर्गिक पध्दतीचा पुरस्कार करणारे लोक, 'तंत्राच्या आहारी गेलेले' म्हणून इतरांना नावे ठेवतात तर; तंत्राचा पुरस्कार करणारे इतरांना 'जुन्याचा आग्रह धरणारे' म्हणून हिणवतात. या सगळ्या गुंतागुंतीत ब्रिटनच्या सर्वोच्च न्यायालयाने आणखी भर घातली आहे. यंदाच्या मार्चमध्ये तेथील एका महिलेची प्रसुती डॉक्टरने शस्त्रक्रियेची गरज असतानाही



नैसर्गिक पध्दतीने केली. त्या महिलेला मधुमेह असल्यामुळे प्रसुतीदरम्यान तिने आपले मूल गमावले. परिणामी, न्यायालयाने या प्रकाराला 'Medical Paternalism' असे नाव देत आदेश काढला की, यापुढे ब्रिटनतील सर्व डॉक्टरांनी दोन्ही पर्यायांचे फायदे आणि तोटे रुग्णांला समजावून सांगावेत. बाळाची होणारी आईच याबाबतीत काय तो निर्णय घेईल. ब्रिटनसारख्या विकसित देशांत हे ठीक आहे. परंतु, भारत आणि ब्राझीलसारख्या देशांत या व्यवसायाचे खाजगीकरण तर होत आहेच; शिवाय, तिथे शिक्षणाचे प्रमाणही कमी आहे. अशा ठिकाणी या निर्णयातून काय साध्य होणार, हाही एक प्रश्नच आहे. वास्तव हे आहे की, लोकांना आज कौशल्यपूर्णरीतीने प्रसुती करणा-या डॉक्टरांपेक्षा तंत्रज्ञानावर आणि ते वापरणा-या तज्ज्ञांवर जास्त विश्वास आहे. ही परिस्थिती बदलायची असेल तर आपल्याला प्रसुतीगृहांचे योग्य व्यवस्थापन करावे लागेल. या विषयातील विज्ञान आणि राजकारण या विषयी लोकांचे प्रबोधन करणे हा आणखी एक उपाय आहे. त्यातून काही निष्पन्न होण्यासाठी बराच काळ जावा लागला तरी नवीन येणा-या पिढ्यांचा त्यातून फायदाच होणार आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

# तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

## उजळणी

# स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...

या ठिकाणी उद्‌धृत केलेले बाबासाहेबांचे विचार १९३८ सालातील विचार त्यांच्या ठायी वसणा-या आणखी एका आगळ्या पैलूचे दर्शन घडवणारे आहेत. आपल्या देशातील कामगारांच्या समस्या, कामगारांचे संघटन, त्या संघटनातील त्रुटी व कच्चे दुवे यांचे अतिशय नेमके भान बाबासाहेबांना होते, या वास्तवाची प्रचीती त्यांच्या पुढील भाषणातून पुरेपूर येते. त्याच वेळी, बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रगल्भ अर्थशास्त्रज्ञही आपल्या पुढ्यात अवतरतो. तत्कालीन समाजव्यवस्थेने तथाकथित 'दलित' म्हणून उपहासलेल्या समाजघटकांतील रेल्वे कर्मचा-यांच्या १९३८ साली नागपूर येथे भरलेल्या परिषदेमध्ये बाबासाहेबांनी दलित समाजातील कर्मचा-यांची वेगळी संघटना निर्माण करण्याबद्दल त्यांच्यावर केल्या जाणा-या टीकेचे परिमार्जन विलक्षण तर्कशुद्धपणे केले. 'ब्राह्मण' आणि 'ब्राह्मणशाही' या दोन संकल्पनांची बाबासाहेबांनी त्या विवेचनादरम्यान केलेली उकल आजही तितकीच प्रस्तुत व मार्गदर्शक ठरते. त्याचप्रमाणे, आपल्या देशात त्या काळी सक्रिय असलेल्या कामगार संघटनांच्या कार्यपद्धतीचे व तत्कालीन कामगार नेतृत्त्वाचे बाबासाहेबांनी जे परखड असे विश्लेषण मांडले तेही आज तितकेच प्रस्तुत असल्याचे स्पष्ट जाणवते. म्हणूनच, ते सारे विवेचन पाऊ ण शतकानंतरही तितकेच ताजे असल्याचे आपल्या ध्यानात येईल.

### *(१) कामगारांचे शत्रू दोन - ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही*

*"माझ्या मते या देशातील कामगारांना दोन शत्रूंना तोंड द्यावे लागेल. हे दोन शत्रू म्हणजे ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे होत. ब्राह्मणशाहीशी शत्रुच्या नात्याने दोन हात करावे लागतील, असे मी जे म्हणतो त्याचा चुकीचा अर्थ कोणी घेऊ नये, असे मला वाटते. ब्राह्मणशाही या शब्दाने ब्राह्मण जातीची सत्ता, हक्क व तिचे हितसंबंध मला सुचवायचे*



*नाहीत. त्या अर्थाने हा शब्द मी वापरीत नाही. ब्राह्मणशाही या शब्दाचा स्वातंत्र्य, समता वा बंधूभाव या तत्त्वांचा अभाव, असा अर्थ माल अभिप्रेत आहे. या अर्थाने त्याने सर्व बाबींमध्ये कहर माजविलेला असून ब्राह्मण तिचे जनक असले तरी आता हा अभाव केवळ ब्राह्मणांपुरताच मर्यादित राहिलेला नाही. या ब्राह्मणशाहीचा सर्वत्र संचार झालेला असून तिने सर्व वर्गाचे विचार व आचार नियंत्रित केले आहेत, ही निर्विवाद गोष्ट आहे. या शिवाय ही ब्राह्मणशाही काही विशिष्ट वर्गांना खास अधिकार देते ही सुद्धा दुमत न होणारी बाब आहे.... आम्हांला दोष देणा-या कामगार पुढा-यांना एक विशिष्ट प्रकारचा भ्रम झालेला आहे. कार्ल मार्क्स वाचल्यामुळे त्यांना एवढेच माहीत आहे की समाजात फक्त कामगार आणि मालक असे दोनच वर्ग असतात. मार्क्स वाचून ते असे गृहीत धरतात की भारतात मालक आणि नोकर असे केवळ दोनच वर्ग आहेत आणि भांडवलशाही नष्ट करण्याची आपली मोहीम सुरूकरतात. या दृष्टीत दोन ढोबळ चुका आहेत. जी बाब संभवनीय आहे किंवा आदर्श आहे तिला वास्तविक समजण्याची पहिली चूक ते करतात. कोणत्याही समाजात नोकर आणि मालक असे केवळ दोनच स्पष्ट वर्ग असतात, असे मार्क्सने कोठेही म्हटलेले नाही. सर्व समाजातील माणसे अर्थप्रवृत्तीचे किंवा बुद्धिवादी किंवा न्यायप्रिय असतात हे म्हणणे जसे खोटे आहे, तसेच सर्व समाजात केवळ दोनच वर्ग असतात, असे समजणेही खोटे आहे. मानवाची अर्थप्रवृत्ती ही मूलभूत बाब समजून निष्कर्ष काढताना अर्थशास्त्रज्ञ नेहमीच एक शहाणपणाची सूचना देत असतात. ती ही की, जर इतर सर्व परिस्थिती समान राहिली तर माणसाची अर्थप्रवृत्ती स्पष्टपणे अस्तित्त्वात असते. कामगार पुढारी ही मूलभूत बाब विसरू न गेले. मार्क्सने जे सांगितले ते युरोपच्या बाबतीत बरोबर होते, असे समजणेही चूक आहे. "जर्मनीमध्ये गरीब व पिळवणूक झालेला माणूस आहे काय ते एकाच वंशाचे, एकाच देशातले, समान भूतकाळ व वर्तमानकाळ असलेले आहेत व त्यांचे भवितव्यही सारखेच राहणार आहे. तर त्यांनी संघटित व्हावे" हा उपदेश मार्क्सच्या काळापासून भाषणातून देण्यात येत आहे. जर्मनीतील गरीब नाडलेला माणूस आणि फ्रान्समधील लुबाडलेला शेतकरी संघटित झाला काय ? १०० वर्षे लोटून गेली तरी ते*

संघटित होण्याचे शिकले नाहीत आणि मागील महायुद्धात ते उघडपणे परस्परांशी निर्दय शत्रुप्रमाणे लढले. भारताच्या बाबतीत तर हा विचार स्पष्टपणे चुकीचा आहे. भारतामध्ये असे सापेक्षपणे निश्चित असे दोन वर्ग अस्तित्त्वात नाहीत. सर्व कामगार एक असून त्यांचा एक वर्ग आहे, ही घोषणा आदर्शरू प असून ती प्रत्यक्षात उतरावयाची आहे म्हणून ती वस्तुस्थिती आहे असे समजून चालणे ही एक फार मोठी चूक आहे. कामगारांचे सैन्य अधिक मजबूत कसे करू शकू? कामगारांमध्ये आपण ऐक्य कसे प्रस्थापित करणार आहोत ? कामगारांच्या एका गटाने दुस-या गटावर अन्याय करू न निश्चितच नव्हे, अन्याय झालेल्या गटाला संघटित होण्यास अडथळा करू नही नव्हे किंवा ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांनी त्या अन्यायाविरु द्ध चळवळ उभारण्यास आडकाठी करू नही नव्हे ! वंश आणि धर्मामुळे एक कामगार दुस-याचा शत्रु बनत असल्यामुळे कामगारांच्या ऐक्याच्या आड येणारी ही कारणे नष्ट करणे हाच कामगार ऐक्याचा खरा मार्ग होय. एक कामगार दुस-या कामगाराला हक्क देऊ शकत नाही, ते स्वतःसाठी मागण्याचा तुम्हाला अधिकार नाही, हे त्यांना सांगणे हाच खरा कामगारांच्या एकीचा उपाय होय. सामाजिक दृष्टीने उच्चनीच भेदभाव मानणे व पाळणे हे तत्त्वतः चूक असून कामगारांच्या संघटनेला ते फार घातक आहे, हे कामगारांना सांगणे हाच कामगार ऐक्याचा खरा मार्ग होय. परंतु कामगारांमध्ये अशा प्रकारची स्फूर्ती निर्माण करणारे कामगार पुढारी कोठे आहेत ? भांडवलशाहीविरु द्ध जोरजोराने भाषण देताना कागार पुढा-यांना मी ऐकले आहे. परंतु कामगारांमध्ये असलेल्या ब्राह्मणशाही विरु द्ध बोलताना मी कोणत्याही कामगार पुढा-याला ऐकलेले नाही. या उलट या मुद्यावरील त्यांचे मौन स्पष्टपणे दिसून येत आहे''.

**(२) भारतातील आजचे कामगार संघटन हे सांडपाण्याचे डबके...**

''भारतातील कामगार संघटन हा एक खेदाचा विषय आहे. कामगार संघटनेचा मुख्य उद्देश पूर्णतः दृष्टिआड झालेला आहे. कामगार वर्गाच्या जीवनस्तराचे कमी होण्यापासून संरक्षण करणे हा कामगार संघटनांचा मुख्य उद्देश आहे. जन्मापासून व प्रशिक्षणामुळे जाणीव झाल्यामुळे



युरोपातील प्रत्येक माणूस आपला जीवनस्तर समाधानकारकपणे योग्य स्थितीत ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत असलेला दिसतो. तो कमी करण्याचा कितीही भयानक प्रयत्न झाला तरी त्याला तो प्रतिकार करतो. भारतीय कामगारात हा दृढनिश्चय आढळून येत नाही, ही एक सुप्रसिद्ध बाब आहे. केवळ जिवंत राहण्यासाठीच तो धडपडत असतो आणि मिलने दर्शविल्याप्रमाणे ''जेथे कोठे या निकृष्टतेकडे नेण्याच्या प्रयत्नांना निग्रही प्रतिकार करण्याची व समाधानकारक जीवनस्तर सांभाळण्याची लोकांची वृत्ती नाही तेथे मोठमोठ्या प्रगतीकारक राष्ट्रातही गरीब लोकाची अवस्था केवळ जीव धारण करण्याच्या स्थितीपर्यंत पोहोचते''. माझ्या मते, जर कामगार संघटनांची नितांत आवश्यकता असणारा कोणता एखादा देश असेल तर तो भारत हाच होय. परंतु मी म्हटल्याप्रमाणे, भारतातील आजचे कामगार संघटन हे एक दुर्गंधीयुक्त सांडपाण्याचे डबके झालेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कामगारांचे नेतृत्त्व एक तर भित्रे, स्वार्थी किंवा पथभ्रष्ट आहे. त्यात काही असेही नेते आहेत की जे केवळ आरामखुर्चीवरचे तत्त्वज्ञानी आहेत किंवा केवळ वर्तमानपत्रात आपले वक्तव्य प्रसिद्ध करण्यातच खूष असणारे राजकारणी आहेत. कामगारांना संघटित करणे, त्यांना शिक्षित करणे आणि संघर्षांमध्ये त्यांना मदत करणे हा त्यांच्या कर्तव्याचा भागच नाही. ते केवळ कामगारांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी व त्यांच्यावतीने बोलण्यासाठी चिंतातूर तर आहेत, परंतु कामगारांशी प्रत्यक्ष संपर्क ठेवण्याचे मात्र ते टाळतात. कामगार नेत्यांचा दुसरा प्रकार असा की, ते केवळ स्वतःला सेक्रेटरी, अध्यक्ष किंवा असेच एखादे पद मिळवण्याच्या हेतूने कामगारांच्या संस्था उभारण्यात दंग राहातात. त्यांची ही पदे सांभाळण्यासाठी ते आपल्या संस्था नेहमी वेगळ्या व परस्परविरोधी ठेवण्याचा प्रयत्न करतात. कधी कधी तर असेही लज्जास्पद व थक्क करू न सोडणारे प्रसंग पाहण्यास मिळतात की, या विभिन्न संस्थांतील लढाई, कामगार आणि मालक जर तसे असेल तर यांच्यातील लढाईपेक्षा फारच दुर्धर असते आणि हे सर्व कशासाठी, तर काही लोकांना कामगारांचा पुढारी म्हणून मिरवून घेण्याची व त्यावर सत्ता गाजविण्याची केवळ हौस असते एवढ्याचसाठी !'' ■■

प्रमुख संदर्भ

**(A) Magazines:**
(1) Down To Earth : 1-15 October 2015 (2) New Scientist : 21 April 2012 (3) The Economist, December 6th 2014.
**(B) Books/Reports:**
(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणेः भाग १ : १९३७ ते १९४५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे : खंड १८, भाग २, २००२.
**(C) Websites:** (1)time.com/4066172/svetlana-alexievich-nobel-laureate-literature/
(2) www.newrepublic.com/article/123075/svetlana-alexievich-dostoevsky-nonfiction.

**Poverty in India**
**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**
(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)
**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**
*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*
**कर्ता-करविता**
**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**
**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**
**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**
●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.
**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये
**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये
**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट
**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट
**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)
(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)
(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

## *ग्रंथालयातील पुस्तके*

**Global Sustainable Development Report 2015: Climate Change and Sustainable Development; Assessing Progress of Regions and Countries, The Energy and Resources Institute, Oxford University Press, New Delhi, 2015, pp.XX + 354, Price: Rs. 995/-.**

वैश्विक स्तरावर अलीकडील काळात घडून येत असलेला हवामान बदल ही उभ्या मानवसमूहाच्या पुढ्यातील मोठी कळीची समस्या ठरते आहे. केवळ येणा-या पिढ्यांच्याच नव्हे तर, एकंदरीने या पृथ्वीवरील प्राणिमात्रांच्या भविष्याबाबतच एक प्रगाढ प्रश्नचिन्ह त्यांमुळे उभे ठाकते आहे. हरितवायूंच्या उत्सर्जनाचे वाढते प्रमाण, पृथ्वीच्या पृष्ठभागाचे वाढू लागलेले तापमान, त्यांपायी बदलत चाललेले पावसाचे चक्र, पालटते पर्जन्यमान, विरघळणार बर्फ आणि विरघळण्याचा त्याचा आताशा वाढत असलेला वार्षिक सरासरी वेग, समुद्राच्या पाण्याची सरासरीने उंचावत असलेली पातळी आणि या सगळ्यांपायी पूर, अतिवृष्टी अथवा अवृष्टी, ढगफुटी, वादळे, चक्रीवादळे... यांसारख्या टोकाच्या नैसर्गिक घटनांची वाढलेली वारंवारता आणि उंचावत असलेली तीव्रता या सगळ्यांच घडामोडींपायी मानवसमाजाची जलसुरक्षा, अन्नसुरक्षा आणि ऊर्जासुरक्षा सावटाखाली येते आहे. या सगळ्या घटनाक्रमांचे सखोल विश्लेषण करत राहणे, त्यांतून उद्भवणा-या धोक्यांची तीव्रता अचूकपणे टिपू शकणारे अनेकविध निर्देशांक तयार करणे, असे निर्देशांक निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत सांख्यिकीचे संकलन जारी ठेवणे आणि अशा वैविध्यपूर्ण निर्देशांकांच्या साहाय्याने जगभरातील देशांची क्रमवारी सिद्ध करत राहणे... अशा विविध आघाड्यांवर अखंड कार्यरत असलेल्या 'टेरी' या ख्यातनाम संस्थेने सिद्ध केलेला हा दस्तऐवज म्हणजे पर्यावरणीय बदलांच्या क्षेत्रातील अध्ययन, संशोधन, अध्यापन, क्षेत्रीय कार्य यांत सक्रिय असणा-या तज्ज्ञ अभ्यासकांच्या जोडीनेच या घडामोडींबद्दल कुतूहल असणा-या सगळ्यांनाच बहुमोल साधनठेवा व संदर्भस्त्रोत ठरावा. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2013-2015**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**